आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२४ फेब्रुवारी २०२५ सोमवार

## **<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेला सहा वर्ष पूर्ण, प्रधानमंत्र्यांच्या हस्ते १९वा हप्ता जारी
- प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत आणखी ३ हजार रुपये देण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा
- भारत आणि ब्रिटन यांच्यात मुक्त व्यापार कराराच्या चर्चा पुन्हा सुरू

**आणि**

- दिवसअखेर साडे आठशेहून अधिक अंकांची घसरण नोंदवून सेन्सेक्स ७५ हजारांच्या खाली बंद

**<><><><><>**

देशातल्या कृषी उत्पादनांच्या निर्यात, प्रक्रिया आणि विपणनाला सरकार प्रोत्साहन देत आहे. जगातल्या प्रत्येक स्वयंपाकघरात किमान एक तरी भारतीय पदार्थ असावा असं आपलं स्वप्न असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज बिहारमध्ये भागलपूर इथं प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १९वा हप्ता जारी केल्यानंतर ते बोलत होते. ते म्हणाले…

९ कोटी ८० लाख शेतकऱ्यांच्या खात्यात यावेळी सुमारे २२ हजार ७०० कोटी रुपयांचं अर्थसहाय्य जमा झालं. मखाण्याच्या उत्पादनाला प्रोत्साहन देणं हा देखील एक महत्त्वाचा उपक्रम असून यासाठी स्वतंत्र मंडळाची स्थापना झाल्यानंतर जागतिक बाजारपेठेत मखाण्याची निर्यात वाढू शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अन्नप्रक्रिया क्षेत्रात प्रगती करण्याची क्षमता पूर्व भारताकडे असून बिहार या क्षेत्रात प्रगती करू शकतो, असंही प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्र्यांनी यावेळी बिहारमध्ये भागलपुर, मुंगेर आणि बक्सर इथे आंबा, टोमॅटो, कांदा आणि बटाटा या पिकांना प्रोत्साहन देण्यासाठी तीन नवीन सेंटर ऑफ एक्सलन्सची घोषणाही केली. भागलपूर इथे आणखी एका केंद्रीय विद्यापीठाची स्थापना करण्यात येईल, अशी घोषणाही प्रधानमंत्र्यांनी यावेळी केली. तत्पूर्वी प्रधानमंत्र्यांनी कृषी आणि त्याच्याशी संबंधित क्षेत्रांच्या ७०० कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विकास प्रकल्पांचं उद्घाटन केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेंतर्गत मिळणाऱ्या रकमेत राज्य शासनातर्फे ३ हजारांची वाढ करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. नागपूर इथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रधानमंत्री कृषी सन्मान योजनेत मिळणारे ६ हजार रुपये आणि राज्य शासनाच्या नमो कृषी सन्मान योजनेचे ६ हजार रुपये शेतकऱ्यांना मिळतात. त्यात आता राज्य शासनाकडून ३ हजार रुपयांची वाढ करण्यात येत असून शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरच वर्षाला १५ हजार रुपये जमा होतील. या योजनेच्या माध्यमातून छोटे शेतकरी तसंच शेतीउत्पादक गटांना फायदा होत असून शेतकऱ्यांना वीज बिल माफी, सौर पंप योजना या योजनांचाही लाभ होत असल्याचं फडणवीस यावेळी म्हणाले.

राज्यात इतरही ठिकाणी विविध मान्यवरांच्या उपस्थिती हे कार्यक्रम झाले.

**<><><><><>**

महिला शांतीरक्षकाच्या गटानं आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली.  शांतता मोहिमेत महिलांचा सहभाग असल्यामुळे ही

मोहीम सर्वसमावेशक झाली आहे, असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या. स्थानिक स्तरावर महिला चांगल्या प्रकारे संपर्क साधू शकतात. त्यामुळे त्या आदर्श काम करू शकतात असं राष्ट्रपती म्हणाल्या. लिंगभाव आधारित हिंसाचाराला महिला अधिक सक्षमपणे तोंड देऊ शकतात आणि संवाद वाढण्यास मदत करू शकतात असं राष्ट्रपती यांनी सांगितलं.

‘शांतीरक्षक महिलाः विकसनशील राष्ट्रांचा दृष्टीकोन’ या विषयावरील महिला शांती सैनिकांसाठीची पहिली परिषद आजपासून दिल्लीत होत आहे. या परिषदेत विकसनशील राष्ट्राच्या ३५ शांतीसेनेच्या तुकड्यांचा सहभाग असणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री सूर्यघर- मोफत वीज योजनेतून आतापर्यंत साडेनऊ लाखांहून जास्त सौर उर्जा संयत्र लावली गेली आहेत अशी माहिती केंद्रीय नवीकरणीय उर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज दिली. नवीकरणीय उर्जा निधीपुरवठा कार्यशाळेच्या निमित्ताने मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत २०३० पर्यंत ५०० गिगावॅट्स नवीकरणीय वीज निर्मितीचं उदिष्ट गाठणार आहे. त्यासाठी दरवर्षी ५० गिगावॅट्स निर्मितीक्षमतेची भर घालण्याचं आपलं उद्दिष्ट आहे असं त्यांनी सांगितलं. या कार्यशाळेतून देशातल्या नवीकरणीय उर्जा क्षेत्रातल्या गुंतवणूक आव्हानांवर लक्ष केंद्रीत झाल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना झालेल्या शिक्षेला नाशिक जिल्हा न्यायालयानं स्थगिती दिली आहे. उद्या सरकारी वकील युक्तीवाद करणार आहेत. त्यानंतर पुढील निर्णय होणार असल्याचं कोकाटे यांचे वकील अविनाश भिडे यांनी सांगितलं.

<><><><><>

रिझर्व्ह बँकेनं न्यू इंडिया सहकारी बँकेच्या ग्राहकांना २७ फेब्रुवारीपासून प्रत्येकी २५ हजार रुपये काढण्याची अनुमती दिली आहे. यामुळं बँकेच्या निम्म्याहून अधिक ग्राहकांना खात्यात शिल्लक असलेली पूर्ण रक्कम काढता येईल. ग्राहकांना या रकमा थेट बँकेच्या शाखांमधून किंवा ATM च्या माध्यमातून काढता येणार असल्याचं रिझर्व्ह बँकेनं कळवलं आहे. या बँकेच्या एकूण २८ शाखा असून त्यापैकी बहुतांश शाखा मुंबई परिसरात आहेत.

रिझर्व्ह बँकेनं या बँकेचं संचालक मंडळ वर्षभरासाठी बरखास्त केलं असून या कालावधीसाठी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या माजी महाव्यवस्थापकांची या बँकेचे प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे. या प्रशासकांना मदत करण्यासाठी रिझर्व्ह बँकेनं सल्लागार समितीही नेमली आहे.

<><><><><>

भारत आणि ब्रिटन यांच्या आजपासून मुक्त व्यापार कराराच्या चर्चा पुन्हा सुरू झाल्या. केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी ब्रिटनचे व्यापार मंत्री जोनाथन रेनॉल्डस

उपस्थित होते. गेल्यावर्षी ब्राझिलमध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे प्रधानमंत्री सर केन स्टार्मर यांच्यात हा करार करण्यावर सहमती झाली होती. मात्र त्यानंतर ब्रिटनमधल्या निवडणुकांमुळं चर्चा पुढे होऊ शकल्या नव्हता.

**<><><><><>**

नव्यानं स्थापन झालेल्या दिल्ली विधानसभेचं पहिलं अधिवेशन आज सुरू झालं. पहिल्या दिवशी विजेंदर गुप्ता यांची विधानसभेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. त्याआधी मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी मंत्री परवेश वर्मा, आशीष सूद, मनजिंदर सिंग सिरसा, कपिल मिश्रा, रविंद्र इंद्राज सिंग आणि पंकज सिंग यांच्यासह सदस्यत्वाची शपथ घेतली. विधानसभेचे हंगामी अध्यक्ष अरविंदर सिंग लवली यांनी सर्वांना शपथ दिली.

नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना सभागृहाला उद्या संबोधित करणार आहेत. गेल्या सरकारच्या कार्यपद्धतीवरचा कॅगचा अहवाल उद्याच सादर केला जाईल. २७ फेब्रुवारी रोजी या अधिवेशनाची सांगता होईल.

**<><><><><>**

तामिळनाडूमध्ये धर्मापुरी जिल्ह्यात गोदामात झालेल्या स्फोटात तिघांचा मृत्यू झाला. स्फोटक पदार्थ या गोदामात साठवलेली होती.

**<><><><><>**

All-India National Public Sector Employees Federation च्या शिष्टमंडळाने आज केंद्रीय कार्मिक सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्तीवेतन

मंत्री जितेंद्र सिंग यांची भेट घेतली. या भेटीत वेगवेगळ्या निवृत्तीवेतन योजनांवर चर्चा झाली. सिंग यांनी या शिष्टमंडळाला NPS आणि UPS या दोन्हीमधले फायदे सांगितले. तंत्रज्ञानामुळे निवृत्तीवेतन योजनांसंबधीच्या सेवा अधिक कार्यक्षम करता आल्या असं त्यांनी सांगितल.  या भेटीदरम्यान शिष्टमंडळाने राष्ट्रीय निवृत्तीवेतन व्यवस्थेमध्ये सरकारची हिस्सेदारी दहा वरुन 14 पर्यंत वाढवल्याबद्दल सिंग यांना धन्यवाद दिले.

<><><><><>

नव्या आयकर विधेयकाचा आढावा घेण्यासाठी नियुक्त केलेल्या संयुक्त संसदीय समितीची आज नवी दिल्ली इथं बैठक झाली. ३१ सदस्य असलेल्या या समितीच्या बैठकीचं अध्यक्षपद भाजपाचे  खासदार  बैजयंत पांडा यांनी भुषवलं.

<><><><><>

जागतिक बाजारातल्या वाढत्या व्यापार तणावामुळे परदेशी गुंतवणूकदारांच्या विक्रीचा ओघ कायम राहिल्याने भारतीय शेअर बाजारात आज सलग पाचव्या सत्रात घसरण कायम राहिली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ८५७ अंकांनी घसरण झाली आणि तो ७४ हजार ४५४ अंकांवर बंद झाला. आयटी, टेलिकॉम अशा क्षेत्रांच्या समभागांमध्येही घसरण पाहायला मिळाली. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २४२ अंकांची घसरण नोंदवत २२ हजार ५५३ अंकांवर बंद झाला.

//<><><><><>//